| | |
|---|---|
| | प्राप्त दिनांक – १३.०८.२०१९<br>नोंदणी दिनांक – १६.०८.२०१९<br>निकाल दिनांक – ०६.०८.२०२६<br>कालावधी – ०६ व. ११ म. २१ दि. |

**भाग–'अ'**

**Form No. XXXII**
**(Title Page of the Judgment)**
**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वैजापुर, जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी – एन. एस. काळे)**

| | |
|---|---|
| CNR NO.MHAU050018552019<br>गुन्हा क्र.१९१/२०१९, वैजापुर पोलिस ठाणे, ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर. | नियमीत फौजदारी खटला क्र.१४३/२०१९<br>निशाणी क्र.३७ |

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>वैजापुर पोलीस ठाणे, ता. वैजापुर,<br>जि. छत्रपती संभाजीनगर. |
| आरोपीं | | **१. शंकर प्रकाश सोनवणे,**<br>वयः ३० वर्षे, धंदाः शेती,<br>रा. भिलाटी, येवला नाकाजवळ, वैजापुर,<br>ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.<br>**२. राजेंद्र नानासाहेब भागवत,**<br>वयः ३२ वर्षे, धंदाः शेती,<br>रा. निवारा नगरी, वैजापुर,<br>ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर. |

| | |
|---|---|
| **अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता** | श्री. जी. एल. कुलकर्णी |
| **आरोपी क्र.१ करिता विधिज्ञ** | श्री. जे. एन. बेग |
| **आरोपी क्र.२ करिता विधिज्ञ** | श्री. आर. एच. शिंदे |

## भाग–'ब'

## (Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारिख | १२.०६.२०१९ |
| फिर्याद नोंदविल्याची तारिख | १३.०६.२०१९ |
| दोषारोप पत्र दाखल झाल्याची तारिख | १३.०८.२०१९ |
| आरोपींविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारिख | १५.०२.२०२० |
| पुरावा प्रारंभाची तारिख | ०६.०१.२०२२ |
| निकाल राखीव दिनांक | --- |
| निकाल दिनांक | ०६.०८.२०२६ |

## आरोपींचा तपशील

| आरोपींचे क्रम | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याची तारिख | चार्ज चे कलम | दोषी किंवा निर्दोष | शिक्षेचा तपशील | अटकेत असल्याचा कालावधी, कलम ४२८ फौ.प्र.सं साठी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शंकर प्रकाश सोनवणे | १३.०६.२०१९ | १३.०६.२०१९ | भा.द.वी कलम ३७९, १०९ व मो.वाहन कायदा कलम १३०/१७७, ३/१८१, ५/१८० व ११३/१९४. | निर्दोष | --- | --- |
| २. | राजेंद्र नानासाहेब भागवत | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे |

## भाग–'क'

## (Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

## सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

## अ–सरकारी साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | चरणसिंग बुधनसिंग नायमने | १४ | फिर्यादी |

| | | | |
|---|---|---|---|
| सा.क्र.२ | नरेश बाबुराव तुरे | १९ | जप्ती पंच |
| सा.क्र.३ | संजय काशिनाथ घुगे | २८ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.४ | बाबासाहेब गबाजी जऱ्हाड | २९ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.५ | गुणवंत रामकिसन थोरात | ३२ | तपासी अंमलदार |

**ब–बचावपक्ष साक्षीदार**

| **अ.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क–न्यायालय साक्षीदार**

| **अ.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**फिर्यादी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशाणी**

**अ–सरकारी**

| **अ. क्र.** | **वर्णन** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | जप्ती पंचनामा | १५ |
| २. | फिर्याद | १६ |
| २. | जप्ती पंचनाम्यावरील पंच क्र.२ ची सही | २० |
| ३. | पंचनाम्याचे फोटो | आर्टीकल 'अ' |
| ४. | मुद्देमाल पावती | ३३ |
| ५. | करारनामा | ३४ |
| ६. | श्रीनाथ वेब्रीज ची वजन पावती | आर्टीकल 'ब' |

**ब–बचावपक्ष**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क–न्यायालय

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३५ व ३६ | फौ.प्र.संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन. |

## ड–जप्त मुद्देमाल

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

( जाहीर दिनांकः– ०६ ऑगस्ट, २०२६)

आरोपींविरुध्द प्रस्तुतचा खटला भारतीय दंड विधान कलम ३७९, १०९ व मोटारवाहन कायदा कलम १३०/१७७, ३/१८१, ५/१८०, ११३/१९४ अन्वये चालविण्यात आला.

**सरकार पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** :–

**२.** दि.१२.०६.२०१९ रोजी २२.०० ते दि.१३.०६.२०१९ रोजीचे ०५.०० वाजेपावेतो कोंबिंग ऑपरेशन व नाकाबंदी चेकिंग व पेट्रोलिंग ड्युटीकामी मा. पोलिस निरीक्षक श्री. कुलकणी यांच्यासोबत फिर्यादी, स.फौ. बोर्डे, पो.ना. घुगे, चालक पो.शि. जऱ्हाड, असे होते. ते दि.१२.०६.२०१९ रोजीचे २२.२३ वाजता पोलिस स्टेशन येथुन ड्युटीकामी वरील नमुद स्टाफ असे सरकारी जीपसह रवाना झाले. पेट्रोलिंग करीत असताना २३.२० वाजता प्रॉपर वैजापुर शहरात गंगापुर रोड आगरवाल कॉम्प्लेक्सच्या जवळ असताना एक टाटा टिप्पर आगरवाल कॉम्प्लेक्सच्या जवळ संशयीतरित्या दिसल्याने ते पोलिस स्टाफ सदर टिप्परजवळ जाऊन त्यास थांबवले. सदर वाहनाचा क्रमांक पाहिला असता एम.एच. ०४ सी.जी. ७८२१ असा दिसून आला. सदर वाहन चालकास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव शंकर प्रकाश सोनवणे, वय ३० वर्षे, रा. भिलाटी, येवला नाकाजवळ, वैजापुर असे सांगीतले. सदर वाहनाची पाहणी

केली असता, त्यात अंदाजे तीन ब्रास वाळु मिळून आली. सदर वाहनाच्या चालकास वाळु वाहतुकीचा परवानाबाबत विचारणा केली असता, त्याकडे परवाना नसल्याचे त्याने सांगीतले. त्यास सदरचे वाहन कोणाच्या मालकीचे आहे व कोणाच्या सांगण्यावरुन तु वाळु वाहतुक करत आहेस अशी विचारणा केली असता, त्याने सांगीतले की, सदरची गाडी ही राजू भागवत, रा. निवारा नगरी, वैजापुर यांची आहे व त्यांच्या सांगण्यावरुन ते वाळुची वाहतुक करत होते असे सांगीतले. त्यानंतर पो.निरीक्षक कुलकर्णी यांनी दोन पंचांना घटनास्थळी बोलावून त्यांना सदर घटनेची माहिती देऊन पंच म्हणुन हजर राहण्याबाबत सांगीतले असता, पंचांनी सहमती दिल्याने त्यांच्यासमक्ष सदर वाहनाचा वाळुसह सविस्तर जप्ती पंचनामा केला व सदरचे वाहन व वाहन चालकास फिर्यादी स्वत: पोलिस स्टेशनला घेऊन आले. त्यानंतर फिर्यादीने महाराष्ट्र शासनाच्या वतीने वैजापुर पोलिस स्टेशन मार्फत आरोपींविरुध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादवरुन वैजापुर पोलीस ठाणे अंमलदार यांनी आरोपींविरुध्द अपराध क्रमांक १९१/२०१९ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७९, १०९ व मोटारवाहन कायदा कलम १३०/१७७, ३/१८१, ५/१८०, ११३/१९४ अन्वये गुन्हा नोंदविला. त्यानंतर सदर गुन्ह्याचा तपास तपासी अंमलदार पो.ना. श्री. गुणवंत रामकिसन थोरात यांनी केला. त्यांनी वैजापुर पोलिस ठाणे अंमलदार यांचेमार्फत भा.द.वी. कलम ३७९, १०९ व मोटारवाहन कायदा कलम १३०/१७७, ३/१८१, ५/१८०, ११३/१९४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांकरिता दोषोरापपत्र दाखल केले.

४. दोषारोप पत्रातील मजकुर व कागदपत्रे पाहुन माझ्या पुर्वाधिकाऱ्यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९, १०९ व मोटारवाहन कायदा कलम १३०/१७७, ३/१८१, ५/१८०, ११३/१९४ अन्वये **निशाणी क्र.४** वर दोषारोप ठेवला. सदरील दोषारोप आरोपीस त्याच्या मातृभाषेमध्ये वाचुन दाखविला असता त्याने तो नाकबुल करुन संपरिक्षेची मागणी केली. संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सा.क्र.१ चरणसिंग बुधनसिंग नायमने यांची साक्ष **निशाणी क्र.१४** वर, सा.क्र.२ जप्ती पंच नरेश बाबुराव तुरे यांची साक्ष **निशाणी क्र.१९** वर, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सा.क्र.३ संजय

काशिनाथ घुगे यांची साक्ष **निशाणी क्र.२८** वर, सा.क्र.४ बाबासाहेब गबाजी जऱ्हाड यांची साक्ष **निशाणी क्र.२९** वर व तपासी अंमलदार सा.क्र.५ गुणवंत रामकिसन थोरात यांची साक्ष **निशाणी क्र.३२** वर नोंदविण्यात आली. तदनंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच सदरील साक्षीदारांच्या साक्षीजबाबांमध्ये आरोपीविरुध्दचे गुन्हा शाबीत करणारी कथने आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन **निशाणी क्र.३५ व ३६** वर नोंदविण्यात आले.

**५.** सरकार पक्षातर्फे विधिज्ञ श्री. जी. एल. कुलकर्णी यांचा व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जावेद बेग यांचा युक्तीवाद ऐकला. पुराव्यावरुन, दाखल कागदपत्रांवरुन व युक्तीवादावरुन खालील मुद्दे माझे विचाराधीन निघाले असून त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसहीत खाली नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.१२.०६.२०१९ रोजी ११.२० वाजेच्या सुमारास अग्रवाल कॉम्प्लेक्सच्या जवळ गंगापुर रोडवर, वैजापुर येथे आरोपीने त्यांच्या ताब्यातील टाटा टिप्पर क्र.एम.एच.०४ सी.जी. ७८२१ मध्ये विनापरवाना बेकायदेशीरित्या वाळु भरुन तिची चोरटी विक्री करण्यासाठी वाहतुक करताना मिळुन आला ? | **नकारार्थी** |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.२ च्या सांगण्यावरुन आरोपी क्र.१ याने वाळुची चोरटी विनापरवाना वाहतुक केली ? | **नकारार्थी** |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी वाहनाचे कागदपत्रे वाहन चालवण्याचा परवाना, विमा इ. कागदपत्रांची मागणी करुन देखील आरोपींनी त्यांची पुर्तता केली नाही ? | **नकारार्थी** |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सदरील वाहन विना नोंदणी क्रमांक व वाहन | |

| | | |
|---|---|---|
| | चालवण्याचा परवाना नसताना चालवले त्यामुळे वाहतुक नियमांचा भंग केला ? | **नकारार्थी** |
| ५. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ कडे वाहन चालवण्याचा सक्षम प्राधिकरणाचा परवाना नसल्याची माहिती असुनदेखील आरोपी क्र.१ याला सदरील वाहन चालविण्यास सांगीतले ? | **नकारार्थी** |
| ६. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सदरील वाहनामध्ये शासनाने ठरवुन दिलेल्या क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतुक केली ? | **नकारार्थी** |
| ७. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## युक्तीवाद

**६.** अभियोग पक्षाने युक्तीवादादरम्यान सांगीतले की, अभियोग पक्षाचा कोणताही साक्षीदाराने अभियोग पक्षास असहकार्य केलेले नाही. जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार यांनी पंच म्हणुन काम करण्यास संमती दिली. आरोपी क्र.२ हाच जप्त केलेल्या टिप्परचा मालक आहे. आरोपी क्र.२ च्या सांगण्यानुसार आरोपी क्र.१ ने विनापरवाना टिप्पमध्ये क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या अवैध वाळुची वाहतुक केली त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रस्तुतचा गुन्हा नोंद झालेला आहे. त्यामुळे सदरील टिप्पर प्रस्तुत खटल्याच्याकामी जप्त करण्यात आला. आरोपींनी सदरील गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द संशयाच्या पलीकडे जाऊन शाबीत केलेले आहे, त्यामुळे आरोपींना कठोरात कठोर शासन करण्यात यावे.

**७.** आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. जावेद बेग यांनी तोंडी युक्तीवादादरम्यान सांगीतले की, प्रस्तुत खटल्यातील सर्व साक्षीदार पोलिस आहेत. प्रस्तुत खटल्यात घटनास्थळ पंचनामा अभियोग पक्षाने शाबीत केलेला नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला

नाही. आरोपींकडुन सदरील वाहन जप्त करण्यात आले नाही. सर्व साक्षीदार पोलिस असल्याने ते घटनेच्यादिवशी कर्तव्यावर हजर असल्याचा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. पोलिसांनी आरोपींकडे कोणतीही कागदपत्रे मागीतलेली नाही. ठाणे अंमलदार यास अभियोग पक्षाने तपासलेले नाही. लॉग बुकमधील नोंद हा पुरावा दिलेला नाही. प्रस्तुत खटल्यातील सर्व साक्षीदार पोलिस आहेत. इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार अभियोग पक्षास मदत होईल असा तपासलेला नाही. पंचनाम्यावरील पंचांना नोटीस दिलेली नाही. प्रस्तुतचा खटल्यामध्ये साक्षीपुराव्यामध्ये विसंगती व उणिवा राहिलेल्या आहेत. केवळ वरिष्ठांच्या सांगण्यावरुन आरोपीविरुध्द खोटे दोषारोप दाखल केलेले आहे. अभियोग पक्षाने संशयाच्या पलीकडे जाऊन फिर्याद शाबीत केलेला नाही. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देऊन आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याची विनंती केली.

८. आरोपी क्र.२ तर्फे विधिज्ञ श्री. आर. एच. शिंदे यांनी तोंडी युक्तीवादादरम्यान सांगीतले की, प्रस्तुत खटल्यात कलम १०९ भा.द.वि. हे लागु होत नाही. पोलिसांना गौण खनिजाविषयची फिर्याद दाखल करण्याचे अधिकार नाहीत. सरकार पक्षाने प्रस्तुत खटल्याची फिर्याद शाबीत केलेली नाही, तसेच जप्ती झाल्याचे सिध्द केलेले नाही. वजन काट्यावरील मोजणीदार तपासलेला आहे. प्रस्तुत खटल्यात तपासलेले सर्व साक्षीदार पोलिस आहेत. घटनास्थळाचा पंचनामा केलेला नाही. त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याची विनंती केली.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ६ करिता –**

९. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रित चर्चिले आहेत.

१०. आरोपींविरुध्दचा गुन्हा शाबीत होण्यासाठी अभियोग पक्षाने एकुण ०५ साक्षीदार तपासलेले आहेत. अभियोग पक्षाने आरोपी क्र.१ ने आरोपी क्र.२ च्या सांगण्यावरुन त्याच्या ताब्यातील टिप्परमधुन तीन ब्रास वाळु विनापरवाना

बेकायदेशीररित्या वाहन चालवण्याचा परवाना व वाहनाची इतर कागदपत्रे नसतांना वाहतुक केली, तसेच वाहतुकीच्या नियमांचा भंग केला असे शाबीत करणे आवश्यक आहे.

**११.** अभियोग पक्षाने फिर्यादी सा.क्र.१ चरणसिंग बुधनसिंग नायमाने यांना **निशाणी क्र.१४** वर तपासले. सदरील साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात कथन केले आहे की, दि.१२.०६.२०१९ रोजी २२ वाजुन २३ मिनीटांनी गंगापुर रोडवरील अग्रवाल कॉम्प्लेक्सजवळ घटना घडली. सदर दिवशी ते त्यांचे वरिष्ठ कुलकर्णी, सहकारी बोर्डे, घुगे व जऱ्हाड कोंबिग ऑपरेशनसाठी गंगापुर चौफुलीच्या दिशेने सरकारी जिपने चाललेले होते. त्यामुळे त्यांना अग्रवाल कॉम्प्लेक्सजवळ एक टिप्पर एम.एच.४ सी.जी. ७८२१ दिसला. त्याला त्यांनी थांबवले व चालकास वरिष्ठांनी नाव, गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव शंकर प्रकाश सोनवणे असे सांगीतले. गाडीमध्ये अंदाजे ३ ब्रास वाळु आढळुन आली. कुलकर्णी यांनी दोन पंचांच्या समक्ष जप्ती पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

**१२.** सदरील साक्षीदाराचा आरोपीच्या वतीने सखोल उलटतपास घेण्यात आला. उलटतपासामध्ये साक्षीदाराने मान्य व कबुल केले आहे की, सदरील टिप्परमधील वाळु त्यांनी प्रत्यक्षात मोजलेली नाही. प्रस्तुतचा गुन्हा दाखल होण्यापुर्वीच वरिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे जप्ती पंचनामा तयार करण्यात आला होता. वरिष्ठांनी त्यांना फिर्याद दाखल करण्यासाठी तोंडी आदेशीत केले होते. आरोपी क्र.२ ला ते व्यक्तिश: ओळखत नाही. इतर सुचना त्यांनी स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत.

**१३.** सा.क्र.३ संजय काशिनाथ घुगे यांची साक्ष **निशाणी क्र.२८** वर नोंदवलेली आहे. सदरील साक्षीमध्ये त्यांनी सांगीतले की, दि.१२.०६.२०१९ रोजी ते १० वाजुन २३ मिनीटांनी शासकीय वाहनाने रवाना झाले. पेट्रोलिंग करत असताना ११ वाजुन २० मिनीटांनी त्यांना गंगापुर रोडवर अग्रवाल कॉम्प्लेक्सजवळ एक टाटा कंपनीचा टिप्पर संशयीतरित्या दिसल्याने सदरील टिप्परची विचारपुस केली. त्यामध्ये ३ ब्रास वाळु होती.

त्यानंतर चालकाचे नाव, गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव शंकर सोनवणे, रा. भिलाटी वैजापुर असे सांगीतले. त्यानंतर पोलिस निरीक्षक कुलकर्णी यांनी दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांच्यासमक्ष जप्ती पंचनामा केला व त्यानंतर पोलिस कॉन्स्टेबल नायमाने यांनी शासनाच्या वतीने फिर्याद दिली.

**१४.** सदरील साक्षीदाराचा आरोपींतर्फे सखोल उलटतपास घेण्यात आला. उलटतपासामध्ये साक्षीदाराने मान्य व कबुल केले आहे की, कुलकर्णी हे त्यांचे वरिष्ठ अधिकारी आहेत व त्यांचे आदेश त्यांना मान्य करावे लागतात. कोंबिग ऑपरेशनला जाण्यासाठी त्यांच्याकडे लेखी आदेश नव्हते, परंतु सहाय्यक फौजदार सोबत होते. पेट्रोलिंगसाठी जात असताना पोलिस डायरीमध्ये नोंद करावी लागते व तो एकमेव पुरावा आहे की, त्यादिवशी काय कारवाई केली. पेट्रोलिंगला जाताना तशी नोंद पोलिस स्टेशन डायरीला केलेली आहे. जप्त वाळुचे मोजमाप त्यांनी केलेले नाही. इतर सुचना त्यांनी स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत.

**१५.** सा.क्र.४ बाबासाहेब गबाजी जऱ्हाड यांची साक्ष **निशाणी क्र.२९** वर नोंदवलेली आहे. सदरील साक्षीमध्ये त्यांनी सांगीतले की, दि.१२.०६.२०१९ रोजी ते २२ वाजुन २६ मिनीटांनी शासकीय वाहनाने रवाना झाले. पेट्रोलिंग करत असताना ११ वाजुन २० मिनीटांनी त्यांना गंगापुर रोडवर अग्रवाल कॉम्प्लेक्सजवळ एक टाटा कंपनीचा टिप्पर संशयीतरित्या दिसल्याने सदरील टिप्परची विचारपुस केली. त्यामध्ये ३ ब्रास वाळु होती. त्यानंतर चालकाचे नाव, गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव शंकर सोनवणे, रा. भिलाटी वैजापुर असे सांगीतले. त्यानंतर पोलिस निरीक्षक कुलकर्णी यांनी दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांच्यासमक्ष जप्ती पंचनामा केला व त्यानंतर पोलिस कॉन्स्टेबल नायमाने यांनी शासनाच्या वतीने फिर्याद दिली.

**१६.** सदरील साक्षीदाराचा आरोपींतर्फे सखोल उलटतपास घेण्यात आला. उलटतपासामध्ये साक्षीदाराने मान्य व कबुल केले आहे की, कुलकर्णी व बोरडे साहेब हे त्यांचे वरिष्ठ अधिकारी आहेत. त्यांचे आदेश त्यांना मान्य करावे लागतात. सदरील

आरोपीचे नाव शंकर सोनवणे असल्याबाबतचा पुरावा त्यांनी व्यक्तीश: पाहिलेला नव्हता. सदरील वाहनाचे मालक कोण आहेत व त्यांचे आर.सी. बुक तपासलेले नाहीत. वाळुचे मोजमाप त्यांनी केलेले नाहीत. त्यांच्यासमक्ष गाडी थांबवली व ती पोलिस स्टेशनला दिली याव्यतिरिक्त कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. जेव्हा गाडी थांबवली, तेव्हा ते शासकीय वाहनातच बसले होते. ते वाहनातुन खाली उतरले नाही. शासकीय वाहन छापाकामी रवाना झाले त्याची नोंद लॉग बुकला करावी लागते, परंतु तशी नोंदीबाबत तपासी अधिकाऱ्याने माझ्याकडे चौकशी केली नाही. इतर सुचना त्यांनी स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत.

**१७.** अभियोग पक्षाने सा.क्र.५ गुणवंत रामकिसन थोरात यांना **निशाणी क्र.३२** वर तपासले. त्यांच्या साक्षीपुराव्यात आले आहे की, दि.१३.०६.२०१९ रोजी ठाणे अंमलदार यांनी त्यांना पोलिस स्टेशनला बोलावुन घेतले व त्यांना ठाणे अंमलदार यांनी सांगीतले की, चरणसिंग नायमाने यांनी पोलिस स्टेशनला फिर्याद दिली आहे. सदरील गुन्ह्याचा तपास त्यांच्याकडे लेखी आदेशाने आला. त्यानंतर त्यांनी आरोपीकडे विचारपुस करुन त्याला अटक केली. त्यानंतर दुसऱ्या आरोपीस अटक केली. वाहनाची कागदपत्रे हस्तगत केली. सदरील वाहन पडवळ याच्या नावावर होते व त्याने ते वाहन राजेंद्र भागवत यास करारनाम्याद्वारे चालवण्यास दिले होते. सदरील करारनामा आरोपीकडुन जप्त केलेला आहे. त्यानंतर साक्षीदारांचे तपासटिप्पण नोंदवले. वाहनाचे फोटो काढले. सदरील वाहनाचे वजन केले. सदरील वाहनाचे वजन काट्यामध्ये वाहनाच्या क्षमतेपेक्षा ९,६५८/– इतके किलो वजन जास्त होते. त्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

**१८.** सदरील साक्षीदाराचा उलटतपास आरोपींच्या विधिज्ञांनी घेतला. उलटतपासादरम्यान त्यांनी मान्य केले आहे की, फिर्यादी हे सदर बीटचे अंमलदार नव्हते. त्यांनी त्यांच्या तपासामध्ये फिर्यादी हे पेट्रोलिंग ड्युटीसाठी जात होते यासंदर्भातील पुरावा जमा केला नाही व त्यांनी तो घेतलेला नाही. ज्या शासकीय वाहनाने ते छापाकामी गेले त्या वाहनाचा क्रमांक वर्णन त्यांना सांगता येणार नाही व तसा

पुरावादेखील त्यांनी घेतलेला नाही. जप्ती पंचनामा त्यांनी केलेला नाही. ११ वाजुन २० मिनीटांपासुन ते गुन्हा दाखल होईपर्यंत आरोपी व गाडी नायमाने यांच्या ताब्यात होती. ते प्रत्यक्ष घटनास्थळावर गेले नाही व त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. प्रस्तुत खटल्यातील सर्व साक्षीदार त्यांचे सहकारी आहेत. सदरील साक्षीदार हे घटनेच्यादिवशी कर्तव्यावर हजर होते असा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. सदरील प्रस्तुत खटल्यातील सर्व साक्षीदारांचे जबाब पोलिस स्टेशनला बसुन टेबलवर घेतलेले आहे. श्रीनाथजी वेब्रीज यांच्याकडे वजन करण्याचा अधिकृत परवाना होता किंवा कसे याबाबत त्यांनी चौकशी केली नाही व सदरील परवान्याची प्रतदेखील त्यांनी दाखल केली नाही. आरोपी क्र.२ हा घटनास्थळी नव्हता. सदरील करारनामा गुन्हा घडण्यापुर्वीचा आहे. इतर सुचना त्यांनी स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत.

**१९.** अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा शाबीत करण्यासाठी सा.क्र.२ नरेश बाबुराव तुरे यांना **निशाणी क्र.१९** वर तपासले आहे. सदरील साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. सदरील साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न विचारले असता, त्यामध्ये आरोपींविरुध्द कोणतीही कथने आलेली नाहीत. सदरील जप्ती पंचनामा फिर्यादीच्यामार्फत अभियोग पक्षाने शाबीत करण्याचा प्रयत्न केला, परंतु सदरील जप्ती पंचनामा हा फिर्यादीने केलेला नाही. ज्या साक्षीदाराने जप्ती पंचनामा केला, ते साक्षीदार ए.पी.आय. कुलकर्णी यांना अभियोग पक्षाने तपासलेले नाही त्यामुळे जप्ती पंचनामा शाबीत झाला असे मानता येणार नाही. प्रस्तुत जप्ती पंचनाम्यावरील दुसरे पंच संतोष जाधव यांनादेखील अभियोग पक्षाने तपासलेले नाही.

**२०.** वरील साक्षीपुराव्यांचे बारकाईने अवलोकन केले असता, असे दिसुन येते की, प्रस्तुत खटल्यात घटनास्थळ पंचनामा करण्यात आलेला नाही. जप्ती पंचनामा हा स्वतंत्र साक्षीदारांकडुन शाबीत केलेला नाही. प्रस्तुत खटल्यातील जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार नरेश बाबुराव तुरे यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. प्रस्तुत खटल्यातील साक्षीदार क्र.१ यांनी त्यांच्या सरतपासात सांगीतले आहे की, घटना २२ वाजुन २३ मिनीटांनी घडली. सा.क्र.४ यांनी सांगीतले आहे की, ते शासकीय वाहनाने

२२ वाजुन २६ वाजता रवाना झाले, तसेच सा.क्र.३ यांनी घटना ११ वाजुन २० मिनीटांनी घडली. सदरील घटनेच्या वेळेबाबत सदरील साक्षीदारांमध्ये विसंगती आहे. सा.क्र.३ यांच्या साक्षीपुराव्यानुसार ते १० वाजुन २३ मिनीटांनी रवाना झाले, तर सा.क्र.४ यांच्या साक्षीपुराव्यानुसार ते १० वाजुन २६ मिनीटांनी रवाना झाले असे विसंगती आलेली आहे. प्रस्तुत खटल्यातील आरोपींचा बचाव आहे की, फिर्यादी व साक्षीदार घटनास्थळावर गेलेच नाही, त्यांनी पोलिस स्टेशनमध्ये बसवुन खोटी कारवाई केली. त्याअनुषंगाने आरोपींच्या विधिज्ञांनी अभियोग पक्षाच्या साक्षीदारांना उलटतपासादरम्यान प्रश्ने विचारलीत की, त्यादिवशी ते कर्तव्यावर हजर असल्याचा पुरावा त्यांनी दिलेला नाही. ज्या शासकीय वाहनाने ते छाप्याकामी रवाना झाले त्या वाहनाच्या लॉग बुकची प्रतदेखील दिलेली नाही. सदरील साक्षीदारांच्या पुराव्यात आले आहे की, सदरील वाळुचे त्यांनी मोजमाप केलेले नाही. साक्षीदार क्र.४ यांच्या पुराव्यात आले आहे की, त्यांच्यासमक्ष काहीही झालेले नाही. ते गाडीतच बसुन होते. आरोपीकडे वाहनासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे मागीतलेली नाहीत. तसेच कोणतीही कागदपत्रेदेखील तपासलेली नाहीत. स्टेशन डायरीची नोंददेखील प्रस्तुत खटल्यातील पुराव्याकामी सादर करण्यात आलेली नाही.

**२१.** तपासी अधिकारी यांच्या पुराव्यात आले आहे की, सदरील वाहनाच्या क्षमतेपेक्षा ९,६५८ किलो इतके वजन जास्त होते. परंतु अभियोग पक्षाने सदरील वाहनाची क्षमता ही किती होती हे अभिलेखावर आणले नाही. ज्या वजन काट्याची पावती अभिलेखावर सादर केली आहे तो वजन काटा अधिकृत होता किंवा कसे याचीदेखील चौकशी तपासी अधिकारी यांनी केलेली नाही. त्यामुळे सदरील वाहनामध्ये जास्त वाळु होती असे शाबीत करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरलेला आहे. सदरील तपासी अधिकारी यांनी वाहनाचे जे फोटोग्राफ्स दाखल केले आहेत, त्यात वाहनाचा क्रमांक स्पष्टपणे नमुद असल्याचे दिसुन येत आहे. तपासी अधिकारी यांनी निशाणी क्र.३४ वर करारनामा दाखल केलेला आहे. सदरील करारनाम्याचे अवलोकन केले असता, सदरील करारनामा हा राजेंद्र नानासाहेब भागवत, प्रकाश सोमनाथ पडवळ

यांच्यामध्ये झालेला आहे. सदरील करारनाम्यानुसार वाहनाचे मुळ मालक प्रकाश पडवळ यांनी सदरील वाहन आरोपी क्र.२ यांना भाडे कराराने दिल्याचे दिसुन येते.

२२. प्रस्तुत खटल्याच्याकामी पोलिस साक्षीदार सोडुन अन्य स्वतंत्र साक्षीदारांकडे चौकशी देखील केलेली नाही. तसेच तपासी अधिकारी यांच्या तपासादरम्यान त्यांनी स्वंतत्र साक्षीदाराकडे चौकशी केलेली नाही. तसेच अभियोग पक्षाचे सा.क्र.१, ३ व ४ यांनी त्यांच्या उलटतपासात स्पष्टपणे मान्य केले आहे की, वरिष्ठ अधिकारी कुलकर्णी यांनी दिलेले आदेश त्यांना पाळावे लागतात. प्रस्तुत खटल्याच्याकामी ज्या शासकीय वाहनाने फिर्यादी व इतर साक्षीदार छापा टाकण्यासाठी गेले होते, त्या शासकीय वाहनाचा क्रमांक तपासी अधिकारी यांना सांगता आला नाही, तसेच त्यांनी तसा पुरावादेखील घेतलेला नाही. तसेच कारवाईसाठी बाहेर जाताना पोलिस डायरीमध्ये केलेली नोंददेखील प्रस्तुत खटल्याच्याकामी सामील केलेली नाही. प्रस्तुत खटल्यातील जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे स्वतंत्र साक्षीदारामार्फत अभियोग पक्षाने शाबीत केलेला नाही. प्रस्तुत खटल्यास कोणताही स्वतंत्र साक्षीदार अभियोग पक्षाने तपासलेला नाही. प्रस्तुत खटल्यातील तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा देखील केलेला नाही. सदरील अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यांमध्ये बऱ्याचशा उणिवा, विसंगती व विरोधाभास आहेत. प्रस्तुत खटल्यातील तपासी अधिकारी यांनी पोलिस स्टेशनमध्ये बसुनच सदरील गुन्ह्याची चौकशी केली असे मान्य केलेले आहे. त्यामुळे वरील विवेचनांवरुन, प्रस्तुत खटल्यातील अभियोग पक्ष हा आरोपी क्र.१ याने आरोपी क्र.२ च्या सांगण्यावुरन टिप्परमधुन तीन ब्रास वाळुची विनापरवाना वाहतुक केली, तसेच आरोपी क्र.१ कडे वाहन चालवण्याचा परवाना नव्हता, तसेच वाहनाची कागदपत्रे त्याने पोलिस अधिकाऱ्यांनी मागीतली असता दिली नाहीत व त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केले असे शाबीत करण्यास असमर्थ ठरलेला आहे. अभियोग पक्ष हा वस्तुस्थिती व पुराव्याची साखळी शाबीत करण्यास असमर्थ ठरलेला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दबावामुळे प्रस्तुतचा गुन्हा आरोपींविरुध्द दाखल केल्याचे नाकारता येत नाही. त्यामुळे

आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरावा आलेला नाही. फौजदारी न्यायशास्त्रानुसार जर घटनेबाबत अथवा आरोपीने गुन्हा केला किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होत असल्यास त्याचा फायदा आरोपीलाच दिला गेला पाहिजे. त्यामुळे, मुद्दा क्र.१ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे.

**मुद्दा क्रमांक ७ करीता :–**

**२३.** मुद्दा क्र.१ ते ६ चे निष्कर्ष विचारात घेता, अभियोग पक्ष आरोपींविरुध्दचे गुन्हे पुराव्यानिशी शाबीत करु शकलेला नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे अपील न्यायालयासमोर उपस्थित होणेसाठी पुढील सहा महिन्यांकरिता प्रतिभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहे. सबब, मुद्दा क्र.७ च्या उत्तरात आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यास पात्र आहेत, म्हणुन पुढील अंतिम आदेश पारीत करीत आहे;

**आदेश**

(१) आरोपी क्र.१ **शंकर प्रकाश सोनवणे** व आरोपी क्र.२ **राजेंद्र नानासाहेब भागवत** यांची भारतीय दंड विधान कलम ३७९, १०९ व मोटारवाहन कायदा कलम १३०/१७७, ३/१८१, ५/१८०, ११३/१९४ अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारोपांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

(२) आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अन्वये दिलेले जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

(३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार वरिष्ठ न्यायालयात अपीलाच्या कामी उपस्थीत राहण्याची नोटीस आल्यास हजर राहण्याबाबत या न्यायालयात रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबा सादर करावा.

(४) प्रस्तुत खटल्यातील मुद्देमाल **एक टाटा कंपनीचा टिप्पर नोंणी क्र. एम.एच.०४ सी. जी. ७८२१** यांचा ताबा मुळ मालकाकडे अपील कालावधीनंतर कायम करण्यात येतो.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)**

Digitally signed by KALE NILESH SUDAM
Date: 2026.08.06 16:40:13 +0530

**दिनांक** : ०६.०८.२०२६ (एन. एस. काळे)
**वैजापुर.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वैजापुर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | | Shubham B. Jadhav, Stenographer (Grade-III). |
| Court | : | Shri. N. S. Kale, Judicial Magistrate First Class, Vaijapur, Dist. Aurangabad. |
| Judgment delivered on | : | 06.08.2026 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 06.08.2026 |
| Judgment uploaded on | : | 06.08.2026 |